# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 03/08/2023 (गुरूवार) दुपार


### चोरी

**१) पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत ०.५ किमी अंतरावर रामटेक रोड मौदा येथे दिनांक ०१/०८/२०२३ चे २३.०० वा. ते दिनांक ०२/०८/२०२३ चे १०.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सागीर मौहम्मद शेख, रा. हनूमान नगर मौदा याच्या मालकीचा आयसर ५५१ कंपनीचा ट्रॅक्टर क्र. एम. एच.— ४० सी.ए— ३८१५ व ट्रॉली क्र. एम.एच— ४०/बी.जे— १५३३ हे दुकानासमोर उभा करून ठेवला व नागपूर येथे कामानिमित्त निघून गेले. दिनांक ०२/०८/२०२३ रोजी सकाळी १०/०० वा. परत आले असता ट्रॅक्टर क्र. एम. एच.— ४०/ सी.ए—३८१५ किंमती अंदाजे १,५०,०००/—रू. व ट्रॉली क्र. एम. एच— ४०/ बीजे— १५३३ किंमती अंदाजे ५०,०००/—रू. असा एकूण २०००००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार पवार मो. क्र. ७८७५९८३३६० हे करीत आहे.

**२) पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत १० किमी अंतरावर वलनी माईन येथे दिनांक ०२/०८/२०२३ चे ११/०० वा. ते ११/३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— विलास रामराज मडावी, वय ४५ वर्ष, रा. वार्ड नंबर चार इंदिरानगर यांची पावर प्लांट येथे सकाळी आठ वाजता युनिट नंबर एक येथे डयुटी लागली तेथे काम करीत असताना पेटीमध्ये वेल्डिंगचे कटिंगचे सामान ठेवलेले होते. फिर्यादी हा जेवण करण्याकरिता गेला असता ११/३० वाजताच्या सुमारास पावर प्लांट युनिट एक मध्ये परत आले असता पेटीत ठेवलेले १) ऑक्सीजन सिलेंडरचे रेग्युलेटर ४ नग किंमती अंदाजे ६५००/— रु. २) कट्टर टॉर्च नोझल ३ नग किंमती अंदाजे २०००/—रुपये ३) अंदाजे पाच मीटर लांबीचा कॉपर केबल किंमती अंदाजे ४०००/—रूपये असा एकुण किंमती अंदाजे १२,५००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार राठौड मो. नं. ८८०६८२८५६० हे करीत आहे.

**३) पो.स्टे. खापरखेडा** :– अंतर्गत ०६ किमी अंतरावर अभी इंजीनियरिंग कार्पोरेशन प्रायव्हेट लिमिटेड नांदा कोराडी महाजन रेस्टॉरंटचे बाजूला दिनांक ०२/०८/२०२३ चे १७/३० वा. ते १८/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– भूषन प्रभाकरराव कोलंकर, वय ३७ वर्ष रा. प्लॉट नंबर ७३, महालक्ष्मी नगर, मानेवाडा नागपुर हा अभी इंजीनियरिंग कार्पोरेशन प्रायव्हेट लिमिटेड नांदा कोराडी येथे नोकरी करीत असुन घटना तारीख वेळी व ठिकाणी सायंकाळी १७/३० वाजता सुमारास फिर्यादी हे ऑफिस समोर बसले असता बाजूला असलेले महाजन शेतीच्या बाजूला एक अनोळखी इसम पिवळया रंगाची टी–शर्ट घातलेला कंपनीच्या आत मध्ये दिसला. कंपनीच्या आवारात ठेवलेले सिलीफॉन मटेरियलचे लोखंडी अँगल कंपाउंड वॉलचे बाहेर फेकत होता. यातील फिर्यादी व त्यांचा सहमित्र व कंपनीतील इतर कर्मचारी त्याला पकडण्यास त्याच्या मागे गेले असता अज्ञात इसम कंपाउंड वॉलचे वरून उडी मारून पळून गेला. फिर्यादी यांनी कंपाउंड वॉलचे वरून पाहिले असता त्याचे सोबत दोन साथीदार हे सुदधा पळून जाताना दिसले. कंपनीमधील ११ नग सिलिफॉन मटेरीयलचे लोखंडी अँगल ११ नग किंमती अंदाजे ५०,०००/– रु. चे अज्ञात आरोपीने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार राउत मो. नं. ८५५४९६७९४० हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**